**उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय**
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड, पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, फॅक्स नं. 02141-222216
ईमेल - dycfalib@mahaforest.gov.in

महाराष्ट्र वन विभाग

**पत्र**

विषयः- उरण चाकण शिक्रापुर एलपीजी पाईपलाईन व ऑप्टीकल फायबर केबल टाकणेसाठी वनक्षेत्र मागणी प्रस्ताव. क्षेत्र 9.4040 हे. अंतर्गत अतिरिक्त वनक्षेत्र मागणी प्रस्ताव 0.8878 हे.

जावक क्र. ब/20/जमिन/ 1529 /2017-18.
अलिबाग - 402 201, दिनांकः 3 /07/2017.

प्रति,

मुख्य प्रबंधक,
एच्.पी.सी.एस्./एल.पी.जी.पाईपलाईन प्रकल्प,
हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि.
हिंदूस्थान भवन, 3 रा माळा,
एस्.व्ही.मार्ग, बलार्ड इस्टेट, मुंबई.

संदर्भः-
1) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांचे पत्र क्र. 6-एमएचसी 033/2014-बीएचओ/482, दिनांक 19/11/2015.
2) महसुल व वन विभाग यांचेकडील शासन आदेश क्र. एफएलडी-1314/प्र.क्र. 150/फ-10 दिनांक 11/05/2016.
3) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांचे पत्र क्र. 6-एमएचसी 033/2014-बीएचओ/1843, दिनांक 30/05/2017.
4) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमीन/956, दिनांक 08/06/2017.
5) आपलेकडील पत्र क्र. प्रोजे./बीएसएन/---, दिनांक 28/06/2017.

उरण-चाकण/शिक्रापूर एलपीजी गॅस पाईपलाईन व ऑप्टीकल फायबर केबल जमिनी खालून टाकण्यासाठी वन जमिन मागणीचे 9.4040 हेक्टर प्रस्तावास केंद्रशासनाने संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये अंतिम मंजूरी दिलेली आहे. तसेच सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासनाने संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये औपचारीक मान्यता प्रदान केली आहे. सदर प्रस्तावांत आखणी मार्गांत बदल केल्याने आवश्यक असणारे मौजे दिघाटी येथील अतिरिक्त क्षेत्र 0.8878 हेक्टरचा प्रस्ताव कार्यान्वित आहे.

सदर प्रस्तावास केंद्रशासनाने त्यांचे संदर्भीय पत्र क्र. 3 अन्वये काही अटींचे अधीन राहून तत्वता मंजुरी प्रदान केली आहे. केंद्रशासनाचे तत्वतः मंजूरी पत्रातील अटींची पूर्तता करणेबाबत या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र. 4 अन्वये आपणास कळविणेत आलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी अट क्र. 4 प्रमाणे पर्यायी वनीकरणासाठी रक्कम रु. 11,56,492/- (अकरा लाख छपन्न हजार चारशे ब्यान्नव) मात्र भरणा करणेबाबत आपणांस कळविणेत आलेले होते.

तथापी सदर प्रकरणी आपलेकडील संदर्भिय पत्र क्र. 5 अन्वये विनंती केलेनुसार पुनःश्च छाननी केली असता, रेडी-रेक्नर दराप्रमाणे सन 2017-18 या वर्षासाठी प्रती हेक्टरी 8,72,044/- याप्रमाणे 1.7756 हेक्टरसाठी रक्कम रु. 15,48,401/- (पंधरा लाख अठ्ठेचाळीस हजार चारशे एक) मात्र भरणा करणे आवश्यक आहे.

तरी याव्दारे आपणास विनंती करण्यांत येत आहे की, प्रस्तुत प्रकरणी अट क्र. 4 प्रमाणे वरील प्रमाणे रक्कम रु. 15,48,401/- (पंधरा लाख अठ्ठेचाळीस हजार चारशे एक) मात्र व या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र. 4 प्रमाणे कळविले प्रमाणे **अट क्र. 5** प्रमाणे नेट प्रेझेंट व्हॅल्युसाठी रक्कम रु. 8,33,644/- (आठ लाख तेहतिस हजार सहाशे चव्वेचाळीस) मात्र भरणा करणेत यावी.

प्रस्तुत प्रकरणी केंद्रशासनाचे तत्वतः मंजुरी पत्रातील अट क्रमांक 4 व 5 प्रमाणे रक्कमांचा forestclearance.nic.in या प्रणालीवर ऑनलाईन चलन जनरेट करुन, भरणा करणे आवश्यक आहे. तसेच भरणा केलेले चलनाची प्रत व इतर अटींबाबत जरुरी पूर्तता करुन परिपूर्ण पूर्तता अहवाल या कार्यालयात दाखल करणे आवश्यक राहील.

(मनीष कुमार)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतिलिपीः- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

(मनीष कुमार)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

D:\LAND 3\2015-16\FCAct\HPCL Dighati proposal\HPCL Dighati proposal.doc